महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०१ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १५६ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# नगरपालिका निवडणुका अचानक पुढे ढकलल्या !

## अंबरनाथ बदलापूरात उद्या होणारे मतदान - आता 20 डिसेंबरला!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ/बदलापूर नगरपरिषद निवडणुकांमध्ये अर्ज अवैध ठरल्यानंतर उमेदवारांनी दाखल केलेल्या दाव्यांवरती उशिरा लागलेला निकाल, अर्ज मागे घेण्यासाठी मिळालेला कमी कालावधी आणि अशा प्रक्रियेत आधीच वाटप झालेले चिन्ह या सर्व गोष्टींमुळे राज्य निवडणूक आयोगाने अशा ठिकाणी नगरपरिषद निवडणूक स्थगित करण्याचे आदेश दिले आहेत. याचा फटका ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ या वर्ग नगर परिषदेला बसला आहे. तर कुळगाव बदलापूर नगर परिषदेतील सहा प्रभागांमध्ये निवडणूक स्थगित झाली आहे. ही निवडणूक आता २० दिवस लांबणीवर गेली असून पूर्वी २ डिसेंबरला होणारे मतदान आता २० डिसेंबरला होणार आहे. हा सर्वपक्षीय उमेदवारांसह स्थानिक प्रशासनालाही धक्कादायक निकाल आहे. ४ नोव्हेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर केल्या. १ डिसेंबर पर्यंत याचा प्रचार केला जाणार होता. सर्व ठिकाणी प्रचार शिगेला पोहोचला आहे. अशातच राज्य निवडणूक आयोगाने ही निवडणूक प्रक्रिया स्थगित केली आहे. तसेच यापूर्वी २ डिसेंबरला मतदान होणाऱ्या बहुतांश ठिकाणी २० डिसेंबरला मतदान घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने २९ डिसेंबर रोजी दिलेल्या आदेशात याबाबत स्पष्ट केले आहे.**

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेची संपूर्ण निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. येथील निवडणूक अधिकारी विजयानंद शर्मा यांनी याबाबत स्पष्ट केले आहे. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात येईल. आमची पूर्ण तयारी झालेली होती. आदेशात काही नव्याने बदल होतात का याकडे आमचे लक्ष आहे असेही शर्मा यांनी स्पष्ट केले आहे. तर याबाबत आम्हाला कोणतीही कल्पना नाही याची लवकरच माहिती घेऊ पण आदेश धक्कादायक आहे अशी माहिती अंबरनाथचे शिवसेना शहर प्रमुख अरविंद वाळेकर यांनी दिली आहे. तर कुळगाव बदलापूर नगरपालिका क्षेत्रात सहा प्रभागांमध्ये निवडणूक पुढे ढकलण्यात आले आहे. प्रभाग क्रमांक प्रभाग क्रमांक ५ ब आणि प्रभाग १५ ब, प्रभाग क्रमांक १७ अ, प्रभाग क्रमांक १० ब, प्रभाग क्रमांक ८ अ, प्रभाग १९ अ या प्रभागात नव्या कार्यक्रमानुसार निवडणूक घ्यावी लागेल अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मारुती गायकवाड यांनी दिली आहे.

नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये अपील दाखल करण्यात आले होते. त्या अपीलांवरील निकाल २२ नोव्हेंबर २०२५ रोजी पर्यंत होणे आवश्यक होते. जेणेकरुन संबंधित उमेदवारास त्याचे नामनिर्देशनपत्र मागे घेण्यासाठी महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम-१९६६ मधील नियम १७(१) (ब) नुसार तीन दिवसाचा कालावधी मिळाला असता. त्यानंतर दि.२६ नोव्हेंबर २०२५ रोजी वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारास निवडणूक चिन्ह वाटप करणे नियमानुसार योग्य ठरले असते. परंतु काही नगरप्ररिषदा, नगरपंचायतींच्या संदर्भात अपीलाचा निकाल उशिराने लागल्या नंतरही, अथवा लेखी निकाल प्राप्त न होता, अथवा काही प्रकरणी अपीलाची सुनावणी झाली नसतांना, अथवा काही प्रकरणी न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहून संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अशा उमेदवारांना आपले नामनिर्देशनपत्र माघारी घेणेसाठी आवश्यक कालावधी न देताच निवडणूक चिन्ह वाटप केले असल्याचे निर्दशनास आले आहे. त्यामुळे अशा प्रकरणी संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी २६ नोव्हेंबर किंवा त्यांनतर केलेली चिन्ह वाटपची कार्यवाही नियमबाह्य ठरते. त्यामुळे, अशा प्रकरणी म्हणजेच जिल्हा न्यायालयातील दाखल प्रकरणात २३ नोव्हेंबर रोजी किंवा तद्नंतर आदेश पारित झालेल्या प्रकरणात नियमांचे पालन झाले नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले असल्यामुळे अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या फक्त संबंधित सदस्यांच्या जागेकरीता आणि अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींचे अध्यक्ष पद असल्यास संपूर्ण नगरपरिषद / नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदासाठी सद्या सुरु असलेली निवडणूक प्रक्रिया स्थगित करुन नियमानुसार पूर्ण झालेल्या टप्प्यांपासून पुढील टप्प्यांसाठी संबंधित नगरपरिषद घ्यावी असे राज्य निवडणूक आयोगाने आदेशात म्हटले आहे. त्यानुसार नव्या कार्यक्रमानुसार नगरपंचायतीच्या निवडणुकीचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे. त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील नियम क्र. ४ (१) (क) मधील तरतूदीनुसार राज्य निवडणूक आयोग या स्थगित करण्यात आलेल्या अशा नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या सदस्यांच्या जागेकरीता व यथास्थिती अध्यक्ष पदाकरीता या आदेशाद्वारे सुधारित निवडणूक कार्यक्रम देत आहे, असे राज्य निवडणूक आयोगाने आदेशात म्हटले आहे.

लक्षवेधी

### कल्याण डोंबिवलीत अजित पवार गट स्वबळावर लढणार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** सद्ध्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत अनेक ठिकाणी महायुतीतील शिवसेना भाजपा स्वतंत्र लढत असून आगामी कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत देखील हे दोन्ही पक्ष स्वतंत्र लढण्याचे संकेत मिळत आहेत. अशातच महायुतीचा घटक पक्ष असलेला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी अजित पवार गटाकडे मात्र या दोन्ही पक्षांचे दुर्लक्ष होत असल्याची भावना पक्षातील कार्यकर्ते व्यक्त करीत आहेत. आगामी निवडणुकीत युती करण्यासंदर्भात शिवसेना भाजपा तर्फे कोणताही प्रस्ताव अद्यापपर्यंत आलेला नसल्याने तसेच राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना युतीसंदर्भात विश्वासात घेतलं जात नसल्याने कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्याकडे स्वबळावर लढण्याची मागणी केली आहे.

मागील वर्षी झालेल्या विधानसभा आणि त्याआधी झालेल्या लोकसभा निवडणुकीत कल्याण डोंबिवली जिल्ह्यात अजित पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे महायुतीचे काम करून महायुतीच्या उमेदवारांच्या विजयात हातभार लावला होता. मात्र आता महानगरपालिका निवडणुकीत हि लढाई स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांची असल्याने या निवडणुकीत शिवसेना भाजपा कडून राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना विश्वासात घेणं अपेक्षित असतांना तसं होतांना दिसत नसल्याने सर्वसामान्य कार्यकत्यांमध्ये रोष वाढत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांना आपापल्या प्रभागात कामं करत असतांना वाव मिळण्यासाठी प्रत्यक्ष निवडणुकीला सामोरे जाणे आवश्यक आहे. त्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाने स्वबळावर लढण्याची मागणी कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्याकडे केली असून आता नाही तर कधीच नाही अशी भावना कार्यकर्त्यांची असल्याची माहिती प्रदेश सरचिटणीस सुभाष गायकवाड यांनी दिली.

### चिकणघर मधील तरूणाची काळा तलावात आत्महत्या

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मोबाईलवरील स्टेटसमध्ये 'आई बाबा मला माफ करा' असा संदेश ठेवत कल्याणमधील चिकणघर भागातील एका तीस वर्षाच्या तरूणाने शनिवारी रात्री काळा तलावात उडी मारून आत्महत्या केली. आपल्या भावाने असा संदेश स्टेटसवर का ठेवला म्हणून मयताच्या लहान भावाला संशय आला. त्याने आपल्या मोठ्या भावाचा कुटुंबीयांच्या साहाय्याने परिसरात शोध घेतला, पण तो आढळला नाही. महात्मा फुले पोलिस ठाणे आणि मयताच्या कुटुंबीयांना केलेल्या शोध कार्यात तरूणाने काळा तलावात आत्महत्या केली असल्याचे उघड झाले.

प्रदीप किसन भोईर (३०) असे मृत तरूणाचे नाव आहे. तो कल्याण पश्चिमेतील चिकणघर येथील दत्त मंदिराजवळील हरीओम सोसायटी परिसरात आपल्या कुटुंबीयांसह राहत होता. भोईर कुटुंब हे मुळचे मुरबाड तालुक्यातील शेलारी गावचे रहिवासी आहेत. नोकरी व्यवसायानिमित्त ते कल्याण येथे राहतात. या आत्महत्या प्रकरणाची माहिती मयत प्रदीप भोईर याचा भाऊ रमाकांत किसन भोईर यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात या मृत्युप्रकरणाची पोलिसांना माहिती दिली.

### उमेदवारी मिळू नये यासाठी काळ्या जादूचा प्रयोग?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण:** कल्याण डोंबिवलीतील पालिकेच्या मोहने येथील शिवसेनेच्या माजी नगरसेविका संगिता गायकवाड यांनी आगामी निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून पालिका निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. याची कुणकुण लागताच प्रभागातील काही इच्छुकांनी संगीता गायकवाड यांना या निवडणुकीत उमेदवारी मिळू नये या कारणावरून संगीता गायकवाड यांच्या दारात शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात इसमांनी काळया जादूचा प्रयोग केला आहे. रविवारी सकाळी गायकवाड कुटुंब सकाळी उठले. तेव्हा त्यांना घराच्या दारात नागवेलीच्या पानावर पत्रावळीत जादूटोणा करणाऱ्या काही विशिष्ट वस्तू ठेवल्याचे निदर्शनास आले. हा प्रकार पाहून गायकवाड कुटुंबियांना धक्का बसला. गायकवाड यांनी भविष्यवेध सांगणाऱ्या एका व्यक्तिकडे याबाबतची विचारणा केली असता गायकवाड यांना येणाऱ्या काळात यश मिळू नये. प्रत्येक राजकीय कामात अडथळा यावा या उद्देशातून केलेले हे काळे कृत्य केले आहे, असे सांगितले. दरम्यान माजी नगरसेविका संगीता गायकवाड यांनी हा प्रकार आपण पोलिसांच्यासही निदर्शनास आणणार आहोत. तसेच, परिसरातील सीसीटीव्ही चित्रण पाहून हे कृत्य कोणी केले याच्या चौकशीची मागणी पोलिसांकडे करणार आहोत, असे संगीता गायकवाड यांनी सांगितले.

## कल्याण-कसारा तिसऱ्या -चौथा रेल्वे मार्गासाठी उल्हासनगरमध्ये भूसंपादन मोजणी पूर्ण

**कल्याण-कसारा रेल्वे मार्गाच्या तिसऱ्या व चौथ्या नवीन रेल्वेमार्गासाठी आज झालेली मोजणी व रेखांकन प्रक्रिया हे निर्णायक पाऊल आहे. सर्व विभागांनी उत्कृष्ट समन्वय राखत पारदर्शक व काटेकोरपणे कार्य केले आहे. नागरिकांच्या हिताचे रक्षण व शाश्वत विकास हा आमचा केंद्रबिंदू असून पुढील टप्प्यांमध्येही प्रशासन तितक्याच वेगाने आणि दक्षतेने काम करणार आहे.**

**मनिषा आव्हाळे, आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर:** कल्याण-कसारा रेल्वे मार्गावरील तिसऱ्या आणि चौथ्या नवीन रेल्वेमार्गाच्या उभारणीसाठी आवश्यक भूसंपादन व बाधित क्षेत्र मोजणीची महत्त्वपूर्ण प्रक्रिया उल्हासनगरात पूर्ण झाली. ठाणे जिल्हाधिकारी यांच्या सूचनांनुसार आणि उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांच्या समन्वयातून ही तांत्रिक मोजणी वेगाने आणि अचूकपणे राबविण्यात आली. महापालिका, नगरभूमापन आणि नगररचना विभागाच्या एकत्रित सक्रियतेमुळे रेल्वे प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेला आता गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या सर्वेक्षण मोहिमेत भूमापन कार्यालयातील गीता पवार यांच्या नेतृत्वाखालील पथकाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. नगररचना विभागातून सर्वेअर दत्ता भोईर यांनी तांत्रिक सहाय्य केले, तर महापालिका मालमत्ता विभागाचे सहाय्यक आयुक्त अजय साबळे, मालमत्ता व्यवस्थापक छाया डांगळे, कनिष्ठ अभियंता सुमित मुकादम आणि इतर कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहिले.

## आजपासून संसदेचे हिवाळी अधिवेशन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी दिल्ली : संसदेचे हिवाळी अधिवेशन आजपासून सोमवार 1 डिसेंबर सुरू होत आहे. बिहारमधील विधानसभा निवडणुकीनंतर होत असलेले हे अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच विविध मुद्द्यावरून सरकार आणि विरोधी पक्षांमधील वातावरण तापल्याचे पहायला मिळत आहे.**

आजपासून सुरू होत असलेले हे अधिवेशन १९ डिसेंबरपर्यंत चालणार आहे. या अधिवेशनात विरोधक कोणत्याही परिस्थितीत एसआयआर (मतदार यादी विशेष सुधारणा) मुद्द्यावर चर्चेची मागणी करण्यावर ठाम असतील तर सरकारने आधीच स्पष्टपणे सांगितले आहे की सभागृहात या विषयावर चर्चा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हा विषय सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे आणि निवडणूक आयोग ही एक संवैधानिक संस्था आहे, आणि म्हणूनच, आयोगाची जबाबदारी संसदेत निश्चित करता येत नाही, असे सरकारचे मत आहे. मात्र विरोधकांनी निवडणूक सुधारणांवर व्यापक चर्चेचा प्रस्ताव ठेवला तर सत्ताधारी त्यावर विचार करू शकतात. अधिवेशन काळात सरकार १० महत्त्वाची विधेयके मांडण्याची योजना आखत आहे, यामध्ये अणुऊर्जा क्षेत्र, उच्च शिक्षण पायाभूत सुविधा सुधारणा आणि कॉर्पोरेट/शेअर बाजार नियमन यांचा समावेश आहे.

## कल्याण डोंबिवलीत भाजपा-शिवसेनेत तणाव

### प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाणांसमोर शिवसेनेची घोषणाबाजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** डोंबिवली पश्चिम भागातील कुंभारखाण पाडा परिसरात गणेश घाट आणि रागाई मंदिर प्रवेशद्वाराच्या उद्धाटनावेळी भाजपा आणि शिवसेनेच्या शक्तीप्रदर्शनामुळं वातावरण तापले होतं. दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर बॅनरबाजी आणि घोषणाबाजी करत परिसरात राजकीय शक्ती दाखवण्याचा प्रयत्न केल्यानं तणावाची परिस्थिती निर्माण झाली. विशेष म्हणजे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या समोरच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केल्यानं परिसरात राजकीय तणाव वाढल्याचं पाहायला मिळालं. याठिकाणी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

शिवसेना कार्यकर्त्यांनी आरोप केला की शिवसेनेचे माजी नगरसेवक विकास म्हात्रे आणि कविता म्हात्रे यांच्या स्वागताचे बॅनर जाणूनबुजून झाकण्यात आले. त्यामुळं उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि भाजपामध्ये वाद झाला. उद्घाटनासाठी भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण उपस्थित असताना शिवसेना कार्यकर्त्यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन केलं. त्याचवेळी भाजपा कार्यकर्त्यांनी शिवसेनेसमोर घोषणाबाजी करत प्रत्युत्तर दिलं. त्यामुळं परिसरात मोठा गोंधळ निर्माण झाला होता.

उद्घाटनासारख्या कार्यक्रमात दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून झालेली बॅनरबाजी, घोषणाबाजी आणि शक्ती प्रदर्शनामुळं परिसरात तणाव निर्माण झाला होता. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवलीत राजकीय वातावरण तापलं आहे. विशेष म्हणजे उद्घाटन सोहळ्यापूर्वीच भाजपा आणि शिवसेनेचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळं तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. अलीकडेच शिवसेनेत प्रवेश केलेले विकास म्हात्रे आणि त्यांची पत्नी कविता म्हात्रे यांच्या समर्थकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहून शक्तीप्रदर्शन केलं. यामुळं भाजपा कार्यकर्त्यांमध्ये नाराजी होती. यावरून भाजपा कार्यकर्ते शिवसेनेविरोधत कुरघोडी करणार असल्याच बोललं जात आहे.



## सौ. कमलताई किसन कथोरे महाविद्यालयाचा "जीवनदीप क्रीडा महोत्सव" संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** सौ.कमलताई किसन कथोरे महाविद्यालय हे नेहमीच विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या स्पर्धा, व्याख्याने आयोजित करीत असते. प्रत्येक स्पर्धेमध्ये मग ती क्रीडा असो कला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला पाहिजे असे महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांना नेहमीच सांगणे असते आणि महाविद्यालय या सर्वांसाठी नेहमीच प्रोत्साहन देत असते. दर वर्षी क्रीडा विभागामार्फत महाविद्यालयात मोठ्या स्तरावर क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते आणि विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा योग्य ते व्यासपीठ मिळावं याच अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील "जीवनदीप क्रीडा महोत्सव २०२५" हा शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर ते शनिवार दि. २९ नोव्हेंबर, २०२५ या दरम्यान घेण्यात आला. महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत विजयी झालेले विद्यार्थिनी (कर्णधार - कु. गायत्री कंटे आणि विद्यार्थिनी) आणि जिल्हास्तरीय Athelatics स्पर्धेत विजय प्राप्त विद्यार्थी कु.चैतन्य गवाळे यांच्या हस्ते जीवनदीप क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. या दोन दिवसीय क्रीडा महोत्सवात कबड्डी, खो-खो, शर्यत-१००/२०० मी., लांब उडी, थाळी फेक, गोळा फेक, कॅरम, बुद्धिबळ या स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर , महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी सर यांचे विशेष सहकार्य तथा मार्गदर्शन लाभले. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. दिनेश शेळके सर, प्रा. मयुरी घागस मॅडम (सदस्य - क्रीडा विभाग) तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तनुजा देसले मॅडम यांनी केलं तर आभारप्रदर्शन प्रा. मयुरी घागस मॅडम यांनी केलं.






दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com
पान : 02
ठाणे ■ सोमवार
01 डिसेंबर 2025

## वाचक मनोगत

### उपचारांबरोबर ‘मानवता’ आणि ‘समानतेचीही गरज

दरवर्षी १ डिसेंबर हा दिवस ‘जागतिक एड्स दिन’ म्हणून जगभर साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व केवळ वैद्यकीयदृष्ट्या नसून सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि मानवी मूल्यांच्या स्तरावर अत्यंत मोठे आहे. कारण एड्स हा आजार मानवी शरीरावर जितका परिणाम करतो त्याहून अधिक तो सामाजिक मनोवृत्ती, पूर्वग्रह, भीती, अज्ञान आणि विषमता यांच्याशी संबंधित आहे. एड्सविषयी बोलताना जगाला सर्वप्रथम जे शिकावे लागले ते म्हणजे हा आजार वैद्यकीय उपचारांनी काही प्रमाणात नियंत्रित होऊ शकतो, पण समाजातील भीती, तिरस्कार आणि भेदभावाविरुद्धची लढाई अधिक कठीण आहे. त्यामुळेच जागतिक एड्स दिवस हा केवळ स्मरणदिन नसून जाणीव, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची आठवण करून देणारा दिवस आहे.

१९८० च्या दशकात जेव्हा हा आजार जगासमोर आला, तेव्हा विज्ञानापेक्षा अफवा, संशय आणि अंधविश्वास अधिक वेगाने पसरले. हा आजार ‘पाप’, ‘अनैतिकता’, ‘भ्रष्ट वर्तन’ किंवा ‘सामाजिक अधःपतन’ यांचे प्रतीक मानला जाऊ लागला. त्यामुळे एचआयव्हीग्रस्त व्यक्तीला लागणारा धक्का हा आजारापेक्षा समाजाच्या प्रतिक्रिया, बहिष्कार आणि मानसिक तणावामुळे जास्त गंभीर होता. समाजशास्त्र सांगते की कोणताही रोग हा केवळ शरीराशी संबंधित नसतो; तो समाजाच्या मूल्यव्यवस्था, नैतिकता, सत्ता, आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक मनोवृत्तीशी जोडलेला असतो. एड्स या आजाराने हे सत्य स्पष्ट केले. आज जगात एचआयव्हीवर उपचार उपलब्ध आहेत. ‘अँटी रेट्रो व्हायरल थेरपी’मुळे एचआयव्हीसह दीर्घायुषी, निरोगी आणि सन्मानाने जीवन जगणे शक्य झाले आहे. तरीही ग्रामीण भागात आजही अनेक मिथके जिवंत आहेत, एड्स स्पर्शाने पसरतो, भांडी शेअर केल्याने होतो, रक्तदानातून किंवा एकत्र बसल्याने लागतो अशी चुकीची धारणा अनेकांची आहे. या अज्ञानामुळे तपासणी न करण्याकडे झुकणारा मानसिकतेचा अडसर निर्माण होतो, आणि वेळेवर उपचार मिळत नाहीत. समाजाने रोगापेक्षा त्या रोगाशी जोडलेल्या चुकीच्या समजुतींविरुद्ध लढा देणे आवश्यक आहे. एड्सविरोधातील चालू मोहिमेत ‘उपचार’, ‘प्रतिबंध’ आणि ‘जागरूकता’ यांच्याबरोबरच ‘मानवता’ आणि ‘समानतेचा अधिकार’ हे दोन मुद्दे केंद्रस्थानी असायला हवेत. कारण एड्सविषयीचा सर्वात मोठा धोका हा रोग नाही, तर त्याच्याशी जोडलेला कलंक, भीती आणि सामाजिक न्यायाचा अभाव आहे. समाज बदलला, विचार बदलले, आणि प्रत्येक व्यक्तीला न्याय्य सन्मान मिळाला तर एड्स हा आजार नियंत्रणात आणणे आणि भविष्यात त्याचे उच्चाटन करणे शक्य होईल. म्हणूनच जागतिक एड्स दिन आपल्याला आठवण करून देतो की, एचआयव्हीग्रस्त व्यक्ती ‘इतर’ कोणी नाही तर तो आपल्याच समाजाचा, आपल्या मानवतेचा भाग आहे. आजारी शरीराला औषध मिळते, पण जखमी मनाला स्वीकार, आधार आणि सन्मान लागतो. आणि जेव्हा समाज उपचाराइतकाच सन्मान देईल, तेव्हा एड्सविरोधातील खरी लढाई जिंकली जाईल.

डॉ. राजेंद्र बगाटे
मो. ९९६०१०३५८२
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

## शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना शिक्षित, दीक्षित आणि योग्य नागरिक बनवावे

### - राज्यपाल आचार्य देवव्रत







**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)** आधुनिक काळात शिक्षकांना विद्यार्थी घडवणे आव्हानात्मक झाले आहे. आजची मुले स्मार्ट आहे त्यामुळे त्यांना शिकवताना शिक्षकांना अधिक स्मार्टनेस दाखवावा लागेल. मुलांना रागावण्याचे किंवा अपमानित करण्याचे युग गेले आहे, असे सांगताना शैक्षणिक संस्थांनी शिक्षित, दीक्षित आणि उत्तम नागरिक घडवावे, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी आज येथे केले.

राज्यपाल देवव्रत यांचा आज देशभरातील डीएव्ही महाविद्यालय शैक्षणिक संस्थांच्या व्यवस्थापन समितीच्या वतीने महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल उलवे येथील भूमिपुत्र सभागृह येथे सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. राज्यपाल देवव्रत हे डीएव्ही संस्थेचे माजी विद्यार्थी असून ते कुरुक्षेत्र हरियाणा येथे निवासी गुरुकुल चालवतात. आजच्या शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांना माहिती मिळत आहे, परंतु जीवनाचे उद्दिष्ट सांगितले जात नाही. त्यामुळे शिक्षण संस्थांमधून अपूर्ण व्यक्तिमत्त्व निर्माण होत आहेत, असे राज्यपालांनी सांगितले. लहान मुले शिक्षकांचे आचरण विचरण पाहत असतात, त्यामुळे शिक्षकांनी आपल्या आचरणातून मुलांपुढे आदर्श ठेवावेत तसेच मुलांना भारतीय जीवन मूल्यांशी जोडावे असे राज्यपालांनी सांगितले. आपण कुरुक्षेत्र येथे अवघ्या सात मुलांना घेऊन गुरुकुल सुरु केले. आज मात्र तेथे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून हे गुरुकुल पाहण्यासाठी देशभरातून लोक येतात असे राज्यपालांनी सांगितले.

डीएव्ही संस्थेच्या वतीने झालेला सत्कार हा आपल्याच कुटुंबाकडून झालेला सत्कार आहे, असे सांगताना आपल्या जडणघडणीत महर्षी दयानंद, आर्य समाज व डीएव्ही संस्थेचे मोठे योगदान आहे, असे राज्यपालांनी सांगितले. शैक्षणिक क्षेत्रात डीएवी संस्थांनी जितके व्यापक योगदान दिले आहे तितके क्वचितच इतर संस्थांनी दिले आहे असे राज्यपालांनी सांगितले. सत्कार सोहळयाला डीएव्ही कॉलेज व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पूनम सूरी, मानद सचिव अजय सुरी, उपाध्यक्ष एस के सोपोरी, प्रबोध महाजन, अनिल कुमार राव, संचालि का डॉ निशा पेशीन, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

## विद्यार्थी सुरक्षेसाठी खाऊच्या गाड्यांवर महापालिकेची कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण, ता. ३० : सेंट ज्यूड्स शाळेच्या आवारात नियमबाह्यपणे उभी असलेली खाऊची गाडी महापालिकेने जप्त केली आहे. संबंधित वाहन शाळा सुटण्याच्या वेळेत विद्यार्थ्यांची गर्दी असलेल्या भागात उभी केले जात असल्याने पालक आणि नागरिकांकडून तक्रारी येत होत्या. या गाडीत ज्वलनशील पदार्थ असल्याने दुर्घटनेचा धोका निर्माण झाला होता.**

नागरिकांनी शाळेला लागून असलेल्या भागात खाऊ गाड्या, फुगेवाले, बेकरीच्या किंवा स्नॅक्सच्या गाड्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन याबाबत तक्रारी केल्या होत्या. विशेषतः गॅस सिलिंडरचा वापर करणाऱ्या गाड्यांमुळे स्फोटाची शक्यता नाकारता येत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. महापालिकेला मिळालेल्या तक्रारीनंतर अधिकाऱ्यांनी दोन दिवस सापळा रचून अखेर कारवाई केली. कारवाईदरम्यान हे वाहन ताब्यात घेऊन जप्त करण्यात आले असून, शाळेच्या आवारात किंवा प्रवेशद्वाराजवळ व्यवसाय करणाऱ्या इतर विक्रेत्यांनाही इशारा देण्यात आला आहे. शाळा परिसरात कोणताही अनधिकृत व्यवसाय होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे निर्देश अधिकाऱ्यांनी दिले आहेत. पालिकेच्या या मोहिमेमुळे पालकांनी दिलासा व्यक्त केला असून, शाळा परिसरात सुरक्षित वातावरण राखले जाण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## निष्ठेसाठी सत्तेला लाथ मारून मी काँग्रेसमध्ये परत आलो

### • राजाभाऊ पातकर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : काँग्रेस माझ्या मनामनात असून सत्तेला लाथ मारून निष्ठेसाठी मी काँग्रेसमध्ये परत आलेला कार्यकर्ता असल्याचे प्रत्युत्तर काँग्रेसचे नवनिर्वाचित कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष राजाभाऊ पातकर यांनी दिले असून मी नेत्यांसह कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन काम करणारा असून काँग्रेस वाढवायची असल्याने नाराजांची मनधरणी करणार असल्याचे देखील पातकर यांनी सांगितले. काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर पक्षाने राजाभाऊ पातकर यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली. यानंतर काँग्रेस पदाधिकार्यांनी त्यांच्या या नियुक्तीवर नाराजी व्यक्त करत सामुहिक राजीनामे देत पातकर यांच्यावर टीका केली होती. त्यांच्या या टिकेनंतर पातकर यांनी या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे. पातकर यांच्या जनसंपर्क कार्यलयात अनेक कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेऊन शुभेच्छा दिल्या यावेळी पातकर बोलत होते.**

सचिन पोटे यांनी जरी राजीनामा दिलेला असला तरी सचिन पोटे हे काँग्रेसचेच आहेत. कुटुंबात वाद होत असतात मात्र मी सर्वांना सोबत घेऊन चालणारा कार्यकर्ता आहे. मला काँग्रेस वाढवायची आहे, कमी नाही करायची. कोणाच्या मनात काही असल्यास त्यांना समजावून काँग्रेससाठी प्रत्येकाने योगदान देण्याची भूमिका मांडली. राजीनामे दिलेल्यांना स्वता फोन करून चर्चा केली. त्यापैकी काही जण भेटून गेले. आपण पूर्वाश्रमीचे काँग्रेसी असून काही कारणास्तव भाजपा मध्ये गेलो होतो. मात्र मनामध्ये काँग्रेस असल्याने सत्तेला लाथ मारून निष्ठेसाठी काँग्रेसमध्ये परत आलेला कार्यकर्ता असल्याचे यावेळी पातकर यांनी सांगितले.

महायुतीतील नाराज निष्ठावान आणि माजी नगरसेवक आमच्या संपर्कात असून कल्याण काँग्रेसमध्ये ३ डिसेंबर नंतर मेगा भरती होणार आहे. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळे यांच्या उपस्थितीत काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असल्याचा दावा काँग्रेस प्रदेश सरचिटणीस नवीन सिंग यांनी केला आहे. बहुजनांचे नेतृत्व करणारा जनसेवक असलेल्या, राजाभाऊ पातकर यांना काँग्रेस पक्षांनी जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे. काँग्रेस पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता त्यांच्यासोबत कार्यरत राहील असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस रीना खांडेकर यांनी व्यक्त केला.

तर राजाभाऊंच्या रूपाने तळागाळातील सर्वसामान्य कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन चालणारे नेतृत्व पक्षाने कल्याण जिल्हा काँग्रेसला दिले आहे. ग्रामीण भागात घराघरात त्यांनी काँग्रेस पोहोचवली. भाजप पक्षात सत्तेला लाथ मारून त्यांनी काँग्रेस मध्ये प्रवेश केला असल्याची प्रतिक्रिया मोहने ब्लॉक अध्यक्ष राजेश वाघमारे यांनी दिली. काँग्रेसने ११ वर्षांनंतर एक खंबीर नेतृत्व कल्याण शहराला दिले आहे. त्यांनी यापूर्वी देखील पक्षासाठी योगदान दिले आहे. त्याचीच दखल घेत पक्षाने त्यांना ही जबाबदारी दिली असल्याचे काँग्रेसच्या अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष सलीम शेख यांनी व्यक्त केले.

पक्ष नेतृत्वाने दिलेल्या आदेशाचे आम्ही पालन करणार असून काँग्रेस पक्ष वाढविण्यासाठी आम्ही जिल्हाध्यक्ष पातकर यांच्याबरोबर असल्याचे श्रेयस सिंग यांनी सांगितले. तर कल्याण काँग्रेसला खंबीर नेतृत्व मिळाले असून, येणाऱ्या निवडणुकीत काँग्रेसकडून उमेदवारी दिलेल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी राजाभाऊ यांच्याबरोबर असणार असल्याचे काँग्रेस पदाधिकारी राजेश दीक्षित यांनी सांगितले. कल्याण डोंबिवली जिल्हा काँग्रेस कमिटी सेवादल विभागाचे लालचंद तिवारी तसेच कल्याण काँग्रेसचे जिल्हा कमिटी पदाधिकारी बंटी परदेशी यांनी देखील पातकर यांना जिल्हाअध्यक्ष पदासाठी शुभेच्छा दिल्या.

## महात्मा फुले पोलीस ठाण्यातील ‘व्हिजिट माय पोलीस स्टेशन’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** नागरिक आणि पोलीस प्रशासन यांच्यातील संवाद अधिक मजबूत करण्यासह त्यांच्या मनातील पोलीस प्रशासनाबाबतचे नकारात्मक चित्र दूर करण्याच्या उद्देशाने आज महात्मा फुले चौक पोलीस ठाण्यात आयोजित ‘व्हिजिट माय पोलीस स्टेशन’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक लोकप्रतिनिधी, सामान्य नागरिक, शालेय विद्यार्थी यांच्यासह महिला वर्गाने यामध्ये मोठा सहभाग घेतल्याचे दिसून आले.

या उपक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, ठाणे जिल्हा प्राधिकरण, ठाणे पोलीस आयुक्तालय, ग्लोबल केअर फाउंडेशन आणि नॅशनल सर्व्हिस स्कीम यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांच्या संकल्पनेतून ठाणे शहरातील सर्व पोलिस ठाण्यांमध्ये



हा उपक्रम राबविण्यात आला. नागरिकांमधील पोलिसांविषयीची अनावश्यक भीती दूर करणे, पोलिसांची कार्यपद्धती समजावून देणे, तसेच विविध कायदेशीर जागरूकता निर्माण करणे या हेतूने आयोजित केलेल्या कार्यक्रमात सर्व वयोगटातील नागरिक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक यांच्यासह महिला वर्गाची लक्षणीय उपस्थिती होती. या सर्वांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यातील प्रत्येक विभागाला भेट देत त्याची कार्यपद्धती संबंधित अधिकाऱ्यांकडून समजावून घेतली.

तसेच या कार्यक्रमादरम्यान नागरिकांना पोलीस ठाण्याची सद्यस्थिती, विविध विभागांचे कार्य, तक्रार नोंद प्रक्रिया, महत्त्वाचे कायदे, नागरिक हक्क, सायबर गुन्हे प्रतिबंध, महिला सुरक्षा, वाहतूक नियम आदी मुद्द्यांवर सविस्तर माहिती देण्यात आली. तर उपस्थित नागरिकांनीही थेट वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी संवाद साधत मार्गदर्शन घेतले. तर केवळ आजच्या दिवसपुरता हा उपक्रम न राबवता एरव्हीही सामान्य नागरीकांना पोलीसांकडून अशाच प्रकारे सहकार्याची वागणूक मिळण्याची अपेक्षा उपस्थित महिलांनी यावेळी व्यक्त केली. तसेच आम्ही आज पहिल्यांदा पोलीस ठाण्यात आलो असून समजात ज्याप्रकारे पोलिसांबद्दल नकारात्मक चित्र निर्माण करण्यात आले आहे तसे अजिबात नसून रिल लाईफ आणि रिअल लाईफमध्ये खूप जास्त फरक असल्याची बोलकी प्रतिक्रिया लॉचे शिक्षण घेत असलेल्या प्राची रोकडे या विद्यार्थीनीने व्यक्त केली. त्यावर बोलताना महात्मा फुले पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस. परदेशी यांनी सांगितले की "नागरिक आणि पोलीस यांच्यातील विश्वास वाढवणे हा आमचा या उपक्रमातील प्रमुख उद्देश आहे. सण-उत्सवांच्या काळात सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांची साथ आमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची असून यापुढेही नागरिकांना आमच्याकडून अशाचप्रकारे सकारात्मक प्रतिसाद दिला जाईल असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

## टॉरेंट पॉवरतर्फे भिवंडीत ‘संगिनी’ कार्यक्रमातून आरोग्य विषयावर महिलांसाठी मेळावा शिबीर संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी ( प्रतिनिधी) :** महिला सबलीकरण आणि कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण आरोग्य-विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी भिवंडीत वीजपुरवठा व वीजबिल वसुली करणाऱ्या टॉरेंट पॉवर कंपनीच्या वतीने " संगिनी " हा महिला साठी

कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भिवंडी शहरातील अंजुर फाटा येथील ओसवाल ऑडिटोरियम सभागृहात आयोजित शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात 200 हून अधिक महिला कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभागी होऊन या कार्यक्रमास उत्तर प्रतिसाद दिला.



**लैंगिक समानता, आरोग्य आणि व्यावसायिक प्रगती यांना अत्यंत महत्त्व देते.महिला कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृद्धी,आरोग्य आणि वैयक्तिक विकासासाठी अशा संगिनी उपक्रमांचे नियमित आयोजन टोरेंट पावर कंपनीच्यावतीने करण्यात येते अशी माहिती यावेळी टोरेंट पावर कंपनीच्या प्रवक्त्यानी दिली.**

महिला या नोकरी व आपल्या कौटुंबिक कामकाज करीत असताना आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करीत असल्याने त्यांना अनेक वेळा विविध आजाराचा सामना करावा लागतो त्यामुळे त्यांना त्रास होत यातून त्यांना निरोगी व स्वास्थ्य योग्य राखण्यासाठी टोरेंट पावर कंपनीच्यावतीने (Nourish to Flourish) महिलांसाठी योग्य आहार, पोषण आणि संतुलित जीवनशैलीचे महत्त्व यावर आधारित संगिनी मार्गदर्शन शिबीर उपक्रम आयोजित करण्यात आले होते

महिलांना आरोग्य-जागरूकता, वैयक्तिक व व्यावसायिक ग्रूमिंग, आर्थिक नियोजन, तसेच कुटुंब आणि कामामधील समतोल साधण्यासंबंधित या उपक्रमातून तज्ञ व्यक्तीव्दारे मार्गदर्शन व संवाद साधण्यात आला. करण्यात आले आहार तज्ञ सुधा शंकरनारायण (संचालक - आशिया, मध्यपूर्व आणि आफ्रिका ) यांनी उपस्थित महिलांना खाद्य उद्योग क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय अनुभव व महिलांच्या आरोग्य,पोषण आणि स्वःताची देखभाल याबाबत उपयुक्त माहिती दिली.महिलांनी कामकाज करत असताना योग्य संतुलित आहार आणि पोषणाना बाबतीत काळजी घेणे आवश्यक आहे. महिलांनी स्वतःची काळजी घेणे ही कुटुंब आणि व्यावसायिक जबाबदाऱ्यांइतकीच आवश्यक आहे असे सुधा शंकरनारायण यांनी सांगितले.

## ब्रह्मांड कलासंस्कार आयोजित बालगोपालांसाठी वेशभूषा स्पर्धा संपन्न

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ब्रह्मांड कट्टा परिवार अंतर्गत कलासंस्कार दरवर्षीच नवनवीन संकल्पनातून कला विषयांत विविध स्पर्धा घेत असतात. ब्रह्मांड कलासंस्कार अध्यक्षा वर्षा गंद्रे यांच्या संकल्पनेतून 23 नोव्हेंबर 2026 रोजी संध्याकाळी 4 वाजता, सांज स्नेह ज्येष्ठ नागरिक हॉल येथे वेशभूषा स्पर्धा यशस्वीरित्या आयोजन केले होते. लहान मुलांनी दिलेल्या विषयांप्रमाणे वेगवेगळी रुपे साकारली होती. संस्थेच्या वतीने सर्व मुलांना स्पर्धेत सहभागी झाल्याचे सर्टिफिकेट व भेटवस्तू देण्यात आल्या. वेशभूषा स्पर्धेचे परिक्षण सोनल आर्ट स्टुडिओच्या



आर्ट टीचर सोनल कुलकर्णी यांनी केले. त्यांनी उत्तम परीक्षण करून वेशभूषा स्पर्धेचा निकाल जाहीर केला त्यात A ग्रुप मध्ये श्रेयांश नाईक प्रथम क्रमांक तर शनाया उदयावर द्वितीय क्रमांक पटकवला. तसेच ग्रुप ब मध्ये मुद्रा दामले प्रथम क्रमांकावर आणि रियांश कासार द्वितीय क्रमांकांवर आहेत असे जाहीर केले. वेशभूषा स्पर्धेचा बक्षीस समारंभ जागतिक कला दिनी होणार आहे असे संस्थापक राजेश जाधव यांनी सांगितले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी कलासंस्कार सचिव पुजारी सदस्या सुप्रिया लोकरे, शुभांगी गोगटे, देवयानी तेलंग अदिती, सुमेधा मोरे व गायत्री अय्यर यांचे सहकार्य लाभले.

## भविष्यवेध



**सोमवार**
**01 डिसेंबर 2025**

**मेष**
योग्य निर्णय घेणे खूप महत्वाचे आहे. आजच्या दिवसाची सुरुवात चांगली होईल. आज तुम्ही उर्जेने परिपूर्ण असाल जेणेकरुन हवे ते सर्व साध्य करता येईल.

**वृषभ**
संवादाशी संबंधित काही नवीन तंत्रज्ञानाचा तुम्हाला नक्कीच फायदा होईल. तुमच्या आजूबाजूच्या लोकांमध्ये तुमची चांगली प्रतिमा तयार होईल. चिंता नाहीशी होईल.

**मिथुन**
तब्येत एकदम ठीक राहील. दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमच्या आई-वडिलांच्या आरोग्याबाबत चिंतेत असाल. आपल्या खर्चात उदार होऊ नका

**कर्क**
इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका, यामुळे जीवनात शांतता येईल. दिवस आत्मविश्वास आणि अपेक्षांचा आहे. कोणत्याही परिस्थितीत निराश होऊ नका.

**सिंह**
मनोरंजक , माहितीपूर्ण साहित्य वाचण्यासाठी वेळ घालवाल, कोणतेही महत्वाचे काम वेळेवर पूर्ण होईल. वरिष्ठांची मर्जी सांभाळाल. समधान मिळेल.

**कन्या**
विद्यार्थी अभ्यासावर लक्ष केंद्रित करतील, आज एक नवीन भेट आणली आहे. आज तुमच्या मनात अनेक सकारात्मक भावना येतील. देवपूजेत दिवस व्यतित होईल.

**तुळ**
प्रियकरासाठी दिवस अनुकूल आहे. कोणाशीही वादात पडू नका अहंकारावर नियंत्रण ठेवा. जास्त विचार केलात तर काही महत्त्वाची उपलब्धी हातून जाईल.

**वृश्चिक**
दिवस खूप चांगला जाणार आहे. आज तुमचे विशेष काम तुमच्या इच्छेनुसार होणार आहे, त्यामुळे कोणतीही मेहनत कमी करू नका. फळाची अपेक्षा नको.

**धनु**
एकमेकांचा दृष्टिकोन समजावून घेऊन वैयक्तिक प्रश्न सोडवा. दिवस चांगला जाणार आहे. जवळच्या नातेवाईकांच्या आगमनामुळे उत्सवाचे वातावरण असेल

**मकर**
सकारात्मक संवाद होतील. प्रत्येक काम नियोजित रीतीने आणि एकाग्रतेने केल्यास यश मिळेल. गुंतवणुकीशी संबंधित महत्त्वाच्या योजनाही यशस्वी होतील.

**कुंभ**
मद्यपानाच्या सवयीवर ताबा मिळविण्यासाठी शुभ दिवस. धन हानी होण्याची शक्यता आहे. देवाण-घेवाणीत सतर्क राहाणे तुमच्यासाठी चांगले.

**मिन**
दिवस अत्यंत महान आहे, कामाकडे लक्ष जाईल, जे लोक पैश्याला विनाकारण खर्च करत होते आज त्यांनी आपल्यावर काबू ठेवला पाहिजे धनाची बचत करा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY




8669244522
9923992390

# चालू वर्षाच्या मागणीसह थकीत पाणी बिल भरणाऱ्या नागरिकांना प्रशासकीय आकारामध्ये 100% सूट

## ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांची घोषणा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे (30) :** महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळसंयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह एक रकमी भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये (दंड / व्याज) 100 टक्के सूट लागू करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी आज दिली. थकीत पाणीपट्टी बिलावर 100 टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

ठाणे महापालिकेने पाणीपट्टी वसुलीची मोहिम हाती घेतली असून जे नागरिक पाणापट्टी भरणार नाही अशा थकीत बिलधारकांचे नळसंयोजन खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, तरी नागरिकांनी पाणीपट्टी भरुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सोरभ राव यांनी केले आहे.

सदर योजना दि. 1 डिसेंबर 2025 ते 31 मार्च 2026 या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये (दंड / व्याज)100 टक्के सूट / सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

जे नागरिक दि.31/03/2026 आपली थकबाकीची रक्कम प्रलंबित ठेवतील अशा खातेदारांवर जप्ती कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन नळ संयोजन खंडीत करणे, मिटर रुम सिल करणे व पंप जप्ती अशी कारवाई होईल असे आयुक्त यांनी यावेळी नमूद केले. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावधी होणेसाठी प्रभाग समिती स्तरावर माहिती फलक लावण्यात यावेत व सदर योजना प्रभावीपणे राबवावी अशी सूचना आयुक्तांनी केली आहे.

या योजनेचा लाभ जास्तीत नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी केले आहे.

# बदलापुरात वाहनचोरीच्या घटनांमध्ये वाढ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर ता. ३० (वार्ताहर):** बदलापूर परिसरात वाहनचोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून, दोन वेगवेगळ्या ठिकाणी चोरीच्या घटना उघडकीस आल्या आहेत. या दोन्हीप्रकरणी बदलापूर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले असून, पोलिस चोरट्यांचा शोध घेत आहेत. बदलापूर पूर्व शिरगाव परिसरातील अमित पार्क येथे राहणारे रिक्षाचालक संदीप गोपीप्रसाद शर्मा (वय २७) यांची रिक्षा (एमएच-०५ डीझेड-४८५२) कर्जत हायवे परिसरातून चोरीस गेली. शर्मा यांनी १८ नोव्हेंबरला रात्री १० वाजता रिक्षा ॲसेस मोटारसमोर उभी केली होती; मात्र २५ नोव्हेंबरला सायंकाळी रिक्षाची चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. सुमारे ५० हजार रुपये किमतीची ही रिक्षा अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल असून, पोलिस उपनिरीक्षक हनुमंत शिर्के पुढील तपास करीत आहेत.

दुसऱ्या घटनेत विनायक रामचंद्र पवार यांची सफेद रंगाची दुचाकी (एमएच-०५-सीएस-१३३७) चोरीला गेली. शुक्रवारी (ता. २८) दुपारी ३.४५ ते रात्री ११.३० या वेळेत कुळगाव-बदलापूर नवीन नगरपालिका गेटजवळ ही चोरी झाली. अंदाजे १० हजार रुपये किमतीचे हे वाहन भिंतीला लॉक करून ठेवले असतानाही चोरट्याने ते पळवून नेले.

### जनसेवक संकेश भोईर यांच्यावतीने

# रामबागेत मोफत आरोग्य शिबिराचे भव्य आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण/दि.30**

'आरोग्य हीच खरी संपत्ती' हे ब्रीदवाक्य घेऊन सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असणारे जनसेवक संकेश रघुनाथ भोईर यांच्या वतीने आज रामबाग-4 येथे भव्य मोफत आरोग्य आणि रक्त तपासणी तसेच मोफत औषध वितरण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. गरीब आणि गरजू नागरिकांना वेळेवर वैद्यकीय तपासणी आणि मोफत औषधे मिळावीत, तसेच वेळेवर निदान होऊन संभाव्य गंभीर आजारांना प्रतिबंध व्हावा, या महत्त्वपूर्ण उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांनी मोठ्या संख्येने उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.



**"नागरिकांनी दाखवलेला उत्साह आणि प्रतिसाद हा नवीन उपक्रम राबविण्यासाठी प्रेरणा देतो. समाजहित आणि लोकांचे दैनंदिन प्रश्न सोडवणे हेच माझे मुख्य उद्दिष्ट असून, आरोग्य सेवा ही त्यातली सर्वात मूलभूत गरज आहे. भविष्यातही असेच उपक्रम सुरू राहतील. आरोग्यासारख्या मूलभूत गरजांवर विशेष लक्ष देऊन प्रभाग विकासाची जबाबदारी घेण्याची ग्वाही मी नक्कीच देईन."**

**संकेश रघुनाथ भोईर (जनसेवक)**

# शहाड-योगीधाम दरम्यान नव्या पादचारी पूलाची मागणी

### भाजपचे शहर अभियंत्याला पत्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण, ता. ३० (वार्ताहर) :** योगीधाम परिसरातून शहाड स्थानक रस्ता परिसरात जाण्यासाठी पादचारी पूल बांधण्याची मागणी भाजपच्या नवीन मंडळ कल्याण शहर उपाध्यक्षा पुष्पा रत्नपारखी यांनी पालिका शहर अभियंता अनिता परदेशी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

कल्याण पश्चिमेतील घोलप नगर, योगीधाम, कैलास गार्डन, गुरु आत्मन परिसरात मोठ्या प्रमाणात बिल्डिंग तयार झाल्या असून यामुळे रहदारी वाढली आहे. या परिसरातून मुरबाड आणि शहाडला जाण्यासाठी सध्या एक उड्डाणपूल असून त्यावर अवजड वाहने, लांब पल्ल्याच्या बसेस, लहान गाड्या, दुचाकींची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असते. याच रहदारीयुक्त पुलावरून, शहाड स्थानकाला जाण्यासाठी रेल्वे प्रवासी, शाळकरी मुले, वरिष्ठ नागरिक, कर्मचारी व इतर नागरिक पायी प्रवास करत असतात.

परिसरात एकच पादचारी पुल असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी असते. यामुळे आणखी एक पादचारी पूल निर्माण होणं आवश्यक असल्याचे पुष्पा रत्नपारखी यांनी म्हंटले आहे. अमृत धामपासून शहाडला अंबर हॉटेल किंवा डीएड कॉलेज जवळ किंवा शक्य असेल तिथे हा पूल निर्माण करण्याबद्दल विचार करता येऊ शकेल. हा पूल निर्माण झाल्यास शहाड व कल्याण पश्चिमचा परिसर जोडला जाईल, अशी माहिती रत्नपारखी यांनी दिली.

### कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा 'नेट झिरो एनर्जी'कडे भक्कम टप्पा!

# डोंबिवलीत दुसऱ्या सोलार हायमास्टचे उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण-डोंबिवली महापालिकेने 'सस्टेनेबल सिटी' या उद्दिष्टाकडे एक मोठे पाऊल टाकले असून, काल सायंकाळी डोंबिवली पूर्वेतील इंदिरा चौकात दुसऱ्या सोलार हायमास्टचे दिमाखात उद्घाटन करण्यात आले. महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या हस्ते हे उद्घाटन टाळयांच्या गजरात पार पडले. या उपक्रमासाठी पॅनासोनीक इंडियाकडून सीएसआर फंड प्राप्त झाला असून महापालिकेच्या विद्युत विभागाच्या पुढाकारातून हा महत्त्वाचा प्रकल्प प्रत्यक्षात आला आहे.**



याप्रसंगी शहर अभियंता अनिता परदेशी, अतिरिक्त शहर अभियंता (विद्युत) प्रशांत भागवत, पॅनासोनीक इंडियाचे संदीप जयपाल, राजा मुखर्जी, आणि सचिन ठुबे, तसेच कार्यकारी अभियंता जितेंद्र शिंदे , उप अभियंता भागवत पाटील, सहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांच्यासह अनेक अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

**"आपले उद्दिष्ट स्पष्ट असून महापालिका क्षेत्रातील प्रत्येक हायमास्ट आणि प्रमुख इमारती सौरऊर्जेवर चालल्या पाहिजेत. कल्याण- डोंबिवली शहरातील 144 हायमास्ट पूर्णपणे सोलारवर आणण्याचे नियोजन सुरू आहे. तसेच महापालिकेच्या सर्व प्रशासकीय आणि शासकीय इमारतींवरही सोलार सिस्टम बसवण्याची तयारी वेगात आहे." शहरातील नागरिकांनी आणि सोसायट्यांनीही पुढाकार घेऊन त्यांच्या इमारतींवर सोलार पॅनल बसवावे."यामुळे वीज बचत, खर्चात बचत, प्रदूषण नियंत्रण आणि ग्रीन एनर्जी निर्माण होऊन आपले कल्याण डोंबिवली शहर एक सस्टेनेबल शहर म्हणून पुढे येईल,"**

**■ महापालिका आयुक्त अभिनव गोयल**

आयुक्त अभिनव गोयल यांच्या संकल्पनेतून चालू असलेल्या 'सस्टेनेबिलिटी अँड सेफ्टी ऑफ सोसायटी बिल्डकॉन' या उपक्रमांतर्गत, शहरातील सोसायट्यांशी संवाद सुरू असून शाश्वत विकासासाठी त्यांचा सहभाग महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.या मोहिमेअंतर्गत वेस्ट मॅनेजमेंट, सोसायटी इमारतींवर सोलार पॅनल, रेनवॉटर हार्वेस्टिंग, वेस्ट वॉटरचा पुनर्वापर, आणि ग्रीन प्लांटेशन यासाठी सोसायट्यांनी विशेष प्रयत्न करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**■ शाश्वत विकासाचे उपक्रम**

महापालिकेने शाश्वत विकासाच्या दिशेने खालील उपक्रम यशस्वीरीत्या कार्यान्वित केले आहेत. त्यामध्ये महापालिका इमारतीवर 0.45 मेगावॅट सौरऊर्जा प्रणाली,नव्या इमारतींवर सोलार सिस्टम अनिवार्य, 250 पेक्षा जास्त इमारतींवर 4.5 मेगावॅट सोलार ऊर्जा कार्यान्वित,सर्व उद्यान आणि स्मशानभूमीमध्ये सोलार सिस्टम,टिटवाळा उद्यान पूर्णपणे सौरऊर्जेवर चालणारे पहिले उद्यान लवकरच उपलब्ध होणार अशी माहिती महापालिकेच्या विद्युत विभागाचे अतिरिक्त शहर अभियंता प्रशांत भागवत यांनी दिली.

कल्याण-डोंबिवली महापालिकेने शहराला 'सस्टेनेबल सिटी' बनवण्यासाठी उचललेले हे पाऊल भविष्यातील ऊर्जा बचत आणि प्रदूषणमुक्त विकासासाठी नक्कीच एक आदर्श ठरणार आहे. नवीन सोलार हायमास्ट शंभर टक्के सौरऊर्जेवर चालणारा असून त्याला महावितरणच्या विजेची गरज भासणार नाही. वीजपुरवठा खंडित झाल्यासही हा हायमास्ट कार्यरत राहील. त्यामुळे शहरातील प्रमुख चौकातील सुरक्षिततेत मोठी वाढ होणार असल्याचे प्रशांत भागवत यांनी सांगितले.

दरम्यान,कल्याण येथील गणपती चौकात पहिला हायमास्ट बसविण्यात आला होता आणि डोंबिवली इंदिरा चौकातील हा दुसरा हायमास्ट आहे. या उपक्रमामुळे 'नेट झिरो एनर्जी' संकल्पनेसाठी महापालिका दृढ पावले उचलत असल्याचे स्पष्ट होते.



# संच मान्यता पूर्ण झाल्यानंतरच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन

### राज्यातील असंख्य शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिलासा

### शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**

दिनांक 15 मार्च 2025 शासन निर्णयावर मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार व दिनांक 20 नोव्हेंबर 2025 रोजीच्या शिक्षण संचालक यांच्या पत्रानुसार सन 2024 - 25 च्या संच मान्यतेमध्ये जे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अतिरिक्त झाले होते त्या अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत शासनाने धोरण निश्चित केलेले होते.

परंतु चालू वर्षाची 2025-26 संच मान्यता नोव्हेंबर पूर्वी होणे अपेक्षित होते परंतु तसे न झाल्याने पुन्हा डिसेंबर महिन्यात सन 2025-26 ची संचमान्यता पूर्ण झाली तर पुन्हा अतिरिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करावे लागणार त्यामुळे ही प्रकिया वारंवार करण्यापेक्षा सन 2025 - 26 ची संचमान्यता पूर्ण झाल्यानंतरच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन करावे अशी मागणी कोकण विभागाचे शिक्षक आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी सतत धरून लावली होती. अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून सन 2025 26 ची संच मान्यता पूर्ण झाल्यानंतरच अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन केले जाणार अशा पद्धतीचे दिनांक 29 नोव्हेंबर 2025 रोजी मा. शिक्षण आयुक्त यांनी शासन पत्रक काढत दिनांक 20 नोव्हेंबर 2025 च्या पत्रकाला स्थगिती देण्यात आली आहे.

त्यामुळे राज्यातील असंख्य अतिरिक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिलासा मिळालेला असून राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे अभिनंदन व आभार व्यक्त केले जात आहेत.

# विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात व्हिजिट माय पोलीस स्टेशन अभियान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी विठ्ठलवाडी पोलिस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मा.अशोक कोळी साहेब ह्यांचा तर्फे Visit My Police Station अभियान राबविण्यात आले होते. दरम्यान याचा प्रमुख उद्देश पोलिस तसेच जनतेमध्ये चांगला संवाद निर्माण व्हावा,जनतेच्या समस्यांचे त्वरित निवारण करणे,पोलिसांच्या कामाच्या पद्धतीची माहिती देणे,तसेच जनतेला भारतीय कायद्याची माहिती देऊन जागरूकता वाढवणे.येणाऱ्या आगामी सण उत्सव यासाठी पोलिस आणि जनतेमध्ये समन्वय साधणे.हे सदर अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट होते... वरिष्ठ पोलिस निरीक्षक मा.अशोक कोळी साहेब, गोपनीय कक्ष पोलिस हवालदार दिनेश शिर्के साहेब,पोलिस हवालदार चेतन खांबेकर साहेब ह्यांनी अतिशय नम्रपणे व कायदेशीर कारवाई पासून जनतेने कशे सतर्क राहून कायदा सुव्यवस्था न बिघडवता कायद्यात राहून कसे चालावे ह्याची चांगली माहिती दिली.. तसेच बहुसंख्येने विठ्ठलवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शालेय शिक्षण विभाग, समाजसेवक, नगरसेवक, पत्रकार, व्यापारी आदि अभियान मध्ये उपस्थित होते..

तसेच सुभाष टेकडी,उल्हासनगर ४ येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा संरक्षणासाठी तेथील पोलिस चौकी चालू करण्याची मागणी केली व ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने पोलिस पेट्रोलिंग वाढवावी ही विनंती केली...

यावेळी भारतीय मानवाधिकार परिषद उल्हासनगर शहर अध्यक्ष - अभिजित भाऊसाहेब चंदनशिव, अध्यक्षा - विनीता वाघ,पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष तथा माजी नगरसेवक प्रमोदजी टाले,वंचित बहुजन उल्हासनगर शहर महिला अध्यक्षा - रेखाताई उबाळे,उल्हासनगर शहर पूर्व उपाध्यक्ष - महेंद्रजी अहिरे,महिला उपाध्यक्ष - वंदनाजी अवचार,धम्मउपासिका - लताजी पडघाण उपस्थित होते..




बदलापूर नगर परिषदेच्या निवडणुकीत भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय युतीचे प्रभाग क्रमांक १९ ब मधील उमेदवार श्री. योगेश भोईर यांच्या प्रचारार्थ भव्य जाहीर सभा शनिवारी सायंकाळी पार पडली. या सभेला आमदार श्री. किसनजी कथोरे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. तसेच युतीच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार सौ. रुचिता घोरपडे यांचेही भाषण झाले. बदलापूर नगर परिषद भ्रष्टाचारमुक्त करण्यासाठी भाजपा युतीला निवडून देण्याचे आवाहन आमदार श्री. कथोरेजी यांनी केले

# नगर परिषदेची निवडणूक पुढे ढकलल्याने उमेदवारांच्या उत्साहावर पाणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ, ता. ३० (वार्ताहर):** अंबरनाथ नगर परिषद निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचलेला असताना रविवारी (ता. ३०) दुपारी अचानकपणे निवडणूक पुढे ढकलण्यात आल्याने संपूर्ण शहरात खळबळ माजली. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या २ डिसेंबरच्या मतदान आणि ३ डिसेंबरच्या मतमोजणीचा कार्यक्रम बदलत न्यायालयाच्या आदेशानंतर निवडणूक २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलण्यात आली. महिनाभरापासून शहरात जोरात सुरू असलेल्या निवडणूक प्रचाराला अचानक 'ब्रेक' लागल्याने उमेदवार, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या उत्साहावर पाणी फेरले तसेच उमेदवारांची यामुळे चिंता वाढली आहे. निवडणूक अगदी दाराशी असताना अचानक आलेल्या आदेशामुळे पोलिस, महसूल विभाग आणि प्रशासन यंत्रणेतही गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

आधीच वाढलेल्या कामाच्या भारात आणखी वाढ झाल्याचे चित्र अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत असून, एकंदरीत ताण वाढला असल्याचे बोलले जाते.




### ठाणे पोलीस आयुक्तालय आयोजित महाविद्यालयीन पथनाट्यांची अंतिम फेरी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात

# जाणीव जागृतीच्या पथनाट्यात कोण मारणार बाजी ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण व्हावी तसेच, जबाबदार नागरिकत्वाची भावना वाढीस लागावी, या उद्देशाने, ठाणे पोलीस आयुक्तालय व राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांच्या संयुक्त विद्यमाने सप्टेंबर महिन्यात ठाणे जिल्हयातील विविध महाविद्यालयांमध्ये पथनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत बाजी मारलेल्या १५ टीममध्ये अंतिम फेरीची स्पर्धा येत्या बुधवारी ०३ डिसेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या कालावधीत ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहातील मिनी थिएटरमध्ये पार पडणार आहे. स्पर्धेतील पहिल्या तीन विजेत्या संघांना ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिके प्रदान केली जाणार आहेत. अशी माहिती ठाणे शहर वाहतुक उपायुक्त पंकज शिरसाट यांनी दिली.

ठाणे शहर वाहतुक शाखेच्यावतीने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रस्ता सुरक्षा, सायबर गुन्हे प्रतिबंध, व्यसनमुक्ती आदी सार्वजनिक हिताचे विषय सर्जनशीलतेने सादर करण्यासाठी उत्तम व्यासपीठ ठरणाऱ्या पथनाटय स्पर्धा सप्टेंबर - २०२५ या महिन्यात ठाणे जिल्ह्यातील विविध ३३ महाविद्यालयांमध्ये आयोजित केल्या होत्या. यामध्ये महाविद्यालयांमधील विद्यार्थी व एनएसएस (NSS) युनिटसने उत्साहाने सहभाग घेऊन ह्या मोहिमेची जनजागृती केली होती.

वाहतुक शाखेने प्रथमच राबविलेल्या या अभिनव उपक्रमाला एनएसएसचे ठाणे जिल्हा समन्वयक जीवन विचारे यांचे मौलिक योगदान लाभले. यात कल्याणमधील सहा महाविद्यालयातील ७० विद्यार्थी, ठाणे डोंबिवलीतील १२ महाविद्यालयातील १२० विद्यार्थी, उल्हासनगरच्या सहा महाविद्यालयांतील ५५ विद्यार्थी, भिवंडीतील सहा महाविद्यालयाचे ६० विद्यार्थी आणि भाईदर येथील तीन महाविद्यालयामधील ३० विद्यार्थ्यांचा समावेश होता. यातील कल्याणचे ३, ठाणे - डोंबिवलीमधील ३, उल्हासनगरचे ३, भिवंडीचे ३ आणि भाईंदरमधील तीन अशा एकुण १५ पथकांनी अंतिम फेरीत प्रवेश केला. या १५ पथकांमधील अंतिम स्पर्धा बुधवार ०३ डिसेंबर रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाटयगृहातील मिनी थिएटरमध्ये होणार असुन यातील प्रथम, द्वितीय आणि तृतिय येणाऱ्या तीन पथकांना रोख पारितोषिके, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार असुन उर्वरीत १२ पथकांना उत्तेजनार्थ सहभाग प्रमाणपत्र प्रदान केली जाणार आहेत.

**रस्ता सुरक्षेसह सायबर गुन्हे आणि व्यसनमुक्तीबाबत जनजागृतीचा प्रभावी संदेश सर्वत्र पोहचवण्याहेतु अंतिम फेरीत सहभागी १५ संघांची पथनाट्ये जिल्ह्यातील सर्व शाळा -महाविद्यालयामध्ये सादर केली जाणार आहेत. तरी, विद्यार्थ्यांमधील कलगुणांचा अविष्कार पाहण्यासाठी सर्वांनी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात उपस्थित राहावे असे आवाहन ठाणे शहर वाहतुक उपायुक्त पंकज शिरसाट यांनी केले आहे.**

ठाणे ■ सोमवार
01 डिसेंबर 2025
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# पालघर नगर परिषदेची अंतिम प्रचाराची रणधुमाळी सुरु

दै.ठाणेजीवनदीपवार्ता

पालघर, ता. जिल्ह्यातील तीन नगरपरिषद व एक नगरपंचायत च्या निवडणुका २ डिसेंबर रोजी होणार आहेत व ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे या काळात अनुसूचित प्रकार घडू नये, त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनानुसार परवानाधारकांची अग्निशस्त्रे जमा करण्यात आली असून. निवडणूक व मतमोजणी या दिवशी पोलीस चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे

निवडणुकीच्या काळात कोठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून परवानाधारकांकडून अग्नी शस्त्रे जमा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहेत डहाणू नगरपरिषद हद्दीतील ४७, जव्हार नगर परिषद हद्दीतील २७, व वाडा नगरपंचायत हद्दीतील १२३, तसेच पालघर नगर परिषदेतील ११८ पैकी ११४, परवानाधारक यांची शस्त्रे जमा असून उर्वरित चार परवानधारकांना खेळाडू व संरक्षणाचे कारणावरून सूट देण्यात आली आहे.

पालघर पोलिस अधीक्षक यतीन देशमुख यांनी मतदारांना शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहकार्य करण्याचे आणि जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन केले आहे. मतदान आणि मतमोजणी शांततेत पार पाडण्यासाठी पालघर पोलिस दलाकडून मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यामध्ये पोलिस अधीक्षक, अप्पर पोलिस अधीक्षक, ८ उपविभागीय पोलिस अधिकारी, ३६ पोलिस निरीक्षक, ४२४ सहायक पोलिस निरीक्षक, २४० पोलिस अमलदार तसेच होमगार्ड आणि राज्य राखीव पोलिस दलाच्या तुकड्यांचा समावेश आहे.

# गेरसे येथे नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत प्रशिक्षण!



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण/नरेंद्र पाटील**

वासिंद पासून अवघ्या दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या गेरसे गावात डॉक्टर पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत प्रशिक्षण संपन्न झाले. गेरसे येथील गावदेवी शेतकरी गटाचे गाव पातळीवरील प्रशिक्षण दिपक दिवाणे यांच्या शेतावर आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणामध्ये प्रसाद भोकरे, सहाय्यक कृषी अधिकारी, गेरसे,व वैशाली भापसे,तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, यांनी जीवामृत तयार करणे प्रात्यक्षिक, हिरवळीच्या खतासाठी चवळी बियाणे वापर तसेच एस ९ कल्चर बिडी कंपोस्ट तयार करणे, सेंद्रिय शेती प्रमाणीकरण याविषयी शेतकऱ्यांना सखोल माहिती दिली व गटामधील शेतकऱ्यांचे महाविस्तार AI ॲप डाऊनलोड करून घेतले.

नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत प्रशिक्षणामध्ये गावातील प्रगतिशील शेतकरी जयवंत दिवाणे यांनी शेतकरी वर्गास नैसर्गिक शेती बाबत महत्त्व व बिजामृत, जीवामृत फायदे सांगितले. यावेळी शेतीनिष्ठ शेतकरी श्रीराम पालवी यांनी शेतकरी गटास हिरवळीच्या खतांच्या वापराचे फायदे याबाबत आपला अनुभव सांगितला.

प्रशिक्षणासाठी ग्रीन डायमंड कंपनी ,अध्यक्ष,श्रीराम पालवी,सचिव शशिकांत दिवाणे गावदेवी शेतकरी गटाचे अध्यक्ष,सचिव व गटामधील सभासद प्रगतिशील शेतकरी दीपक दिवाणे, भास्कर दिवाणे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# प्राथमिक शिक्षक पतपेढीच्या चेअरमनपदी दिपक घरत यांची बिनविरोध निवड

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)**

संस्थापक स्वर्गीय ह.बा. शिंदे गुरुजी निर्मित उरण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लिमिटेड उरण ही रायगड जिल्ह्यातील अग्रगण्य अशी पतपेढी आहे. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत सर्वानुमते दिपक दशरथ घरत यांची पतपेढीच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी संचालक व माजी चेअरमन प्रभाकर घरत नवनीत गावंड ,राजश्री मोकल, प्रशांत पाटील, शर्मिला गावंड, मंदार रसाळ यांनी नवनिर्वाचित चेअरमन यांना शुभेच्छा देऊन गुणगौरव केला.

पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती प्रकाश जितेकर साहेब यांनी नवनिर्वाचित चेअरमन दिपक घरत यांना शुभेच्छा दिल्या.या शुभप्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ रायगड जिल्हाध्यक्ष डॉ.सुभाष भोपी,उपाध्यक्ष जयदास घरत,जिल्हा सरचिटणीस विकास पाटील,पनवेल तालुका अध्यक्ष प्रभाकर घरत,उरणतालुकाध्यक्ष महेंद्र गावंड ,पनवेल तालुका चिटणीस गंगाधर पाटील पनवेल तालुका सहचिटणीस राजेन्द्र मोकल या मान्यवरांनी दिपक घरत चेअरमन पदी विराजमान झाल्याबद्दल सदभावना व्यक्त व्यक्त करून शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास पतपेढीचे आजी-माजी संचालक,तज्ञसंचालक ,आप्तेष्ट ,नातेवाईक, मित्रमंडळी तसेच महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ रायगड जिल्हा कार्यकारणी सदस्य आणि पनवेल तालुका कार्यकारणी सदस्य आणि शुभचिंतक बहुसंख्येने उपस्थित होते. सौ.सुप्रिया दिपक घरत यांनीही आपल्या यजमानांना चेअरमन पदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या

यावेळी घरत कुटुंबीय आणि मोठे ओवळे ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच मावळते चेअरमन मंदार रसाळ यांनी नवनिर्वाचित चेअरमन दिपक घरत यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रम यशस्वी होण्याकरता पतपेढीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली. प्रभाकर घरत यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

> **नवनिर्वाचित चेअरमन दिपक घरत यांनी आपल्या मनोगतात संस्थेचे हित आणि सभासदांचे कल्याण या दृष्टिकोनातून निर्णय घेण्याविषयी आपली भूमिका स्पष्ट करून पतपेढी घ्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सभासद हा पतपेढीचा आत्मा आहे या भावनेने सभासदांचा सन्मान लागतच काम करणार**
> **- दिपक घरत**
> **नवनिर्वाचित चेअरमन**

# भिवंडी महापालिकेच्या सुधारीत मतदार यादीवरील हरकती व सूचना 3 डिसेंबर पर्यंत स्वीकारणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी) भिवंडी शहर महानगरपालिकेच्या आगामी होणाऱ्या निवडणूका डोळयासमोर ठेवून शिवसेना, कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस, मनसे आणि भारतीय जनता पक्षासह इतर अन्य अपक्ष उमेदवारांनी आपापली तयारी सुरू केली आहे. महापालिका प्रशासनाने मतदार यादी प्रसिद्ध केल्याने अनेकांनी महापालिकेच्या निवडणूक विभागात जाऊन मतदार यादी खरेदी करून हरकती घेण्यासाठी तपासणी काम सुरू केले असतानाच आता भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सुधारित मतदार यादीच्या कार्यक्रमा नुसार हरकती व सूचना मागविण्याच्या तारखेस मुदतवाढ दिली असून त्यानुसार नागरिकांच्या हरकती व सूचना महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाचे अधिकारी दि.३ डिसेंबर २०२५ पर्यंत स्वीकारणार असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली आहे.**

महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, प्रारुप मतदार यादीच्या अनुषंगाने प्राप्त हरकतींबाबत करावयाच्या कार्यवाही बाबत क्षेत्रीयस्तरावर काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना महापालिकेचे आयुक्त,अतिरिक्त आयुक्त व उपयुक्त(निवडणूक) यांच्या मार्फत भिवंडी मनपात मार्गदर्शन सत्र राबविण्यात आले. त्या मध्ये महापालिकेचे आयुक्त अनमोल सागर, अतिरिक्त आयुक्त नयना ससाणे, उपायुक्त (निवडणूक) विक्रम दराडे यांनी राज्य निवडणूक आयोगाने ता.१६/०७/२०२५ रोजीच्या पत्रानुसार दिलेल्या मार्गदर्शक सूचनांबाबत क्षेत्रीय स्तरावर काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

भिवंडी महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने एकुण २३ प्रभागांच्या प्रारुप मतदार याद्या ता.२०/११/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या प्रारुप मतदार याद्यांवर ता. २७/११/२०२५ रोजी पर्यंत हरकती व सूचना नागरिकांकडून मागविण्यांत आल्या होत्या.दरम्यान राज्य निवडणूक आयोगाकडील ता. २६/११/२०२५ रोजीच्या सुधारीत मतदार यादी कार्यक्रमानुसार हरकती व सूचना मागविण्याच्या तारखेस मुदतवाढ देऊन, आता हरकती व सूचना ता.०३/१२/२०२५ रोजी पर्यंत संबंधित प्रभाग समिती कार्यालयात स्विकारल्या जाणार आहेत,अशी माहिती मार्गदर्शन सत्रात देण्यात आली. सदर मार्गदर्शनामध्ये मतदार चुकीने दुसऱ्या प्रभागात समाविष्ट केले गेले असल्याची हरकत प्राप्त झाली असल्यास, प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन ते दुरुस्त करुन घेणेबाबत सूचना करण्यांत आल्या. त्याकामी बी.एल.ओ.यांची मदत घेण्याबाबत निर्देश दिले. दुबार मतदार नोंदीबाबत राज्य निवडणूक आयोगाकडील ता.२९/१०/२०२५ रोजीच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यांत आले आहेत. संपूर्ण काम पारदर्शी पद्धतीने व कोणत्याही राजकीय दबावाला अथवा अमिषाला बळी न पडता निष्पक्ष पद्धतीने करण्याबाबत निर्देश देऊन, अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कडक कारवाई करण्याचा इशारा पालिका आयुक्तांनी दिला आहे.

# शिक्षण परिषदेतून राज्यतील शिक्षकांना सकारात्मक शिस्तीचे धडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी) :** राज्यात काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांवरील शारीरिक शिक्षेचे प्रकार समोर येत असून समाजात याबाबत गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, सुरक्षित वातावरण आणि शिक्षक–विद्यार्थी नातेसंबंध अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने शालेय शिक्षण विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके आणि केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदांमध्ये 'सकारात्मक शिस्त' या विषयावर किमान 45 मिनिटांचे विशेष सत्र आयोजित करण्याचे निर्देश

देण्यात आले आहेत. हे सत्र डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येणार आहे.

या मार्गदर्शन सत्रामध्ये विविध मुद्द्यांवर चर्चा केली जाणार असून त्यामध्ये शारीरिक शिक्षेबाबत शिक्षण अधिकार अधिनियमातील तरतुदी व शिक्षकांची जबाबदारी, शिक्षेचे प्रकार व स्वरूप, शिक्षेचे परिणाम, शिक्षेचा मनावर व मेंदूवर होणारा परिणाम , विविध शैक्षणिक विचारवंत व त्यांचे सकारात्मक शिस्तीचे विचार,सकारात्मक शिस्त तत्वे व त्यांची अंमलबजावणी, संवाद सहकार्य व समुपदेशन यावर आधारित वर्ग व्यवस्थापन,योग्य शिस्तीचे मार्ग, सकारात्मक शिस्तीचे तंत्र व उपक्रम आदी मुद्द्यांच्या अनुषंगाने या शिक्षण परिषदेमध्ये सुलभन केले जाणार आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने विकसित केलेल्या मुख्याध्यापक मार्गदर्शिका भाग दोन मधील 'सकारात्मक शिस्त -एक आव्हान ' या लेखाचा आधार घेण्याचे सुचविण्यात आले आहे.

शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांच्या मार्गदर्शन व प्रेरणेने शालेय शिक्षण विभागाने नुकतेच डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सकारात्मक शिस्त याविषयी शिक्षण परिषदेचे आयोजन करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहेत."शिस्त ही भीतीतून नाही तर विश्वासातून निर्माण झाली पाहिजे. सकारात्मक शिस्त हीच मुलांच्या उज्वल भविष्याची खरी पायाभरणी आहे." असे प्रतिपादन शिक्षणमंत्री श्री. दादाजी भुसे यांनी यावेळी केले.

# टीएमटी बसच्या इंजिनला आग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. ३० :** वर्तकनगर येथून ठाणे स्थानकाच्या दिशेने निघालेल्या टीएमटी बसच्या इंजिनजवळ आग लागण्याची घटना घडली. बसचालकाने प्रसंगावधान राखत बस बाजूला घेऊन सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढल्यामुळे मोठा अनर्थ टळला. शनिवारी (ता. २९) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास (एमएच ०४ एच वाय १७५७) या क्रमांकाची बस वर्तकनगर येथून ठाणे स्थानकाकडे जात असताना सिंघानिया हायस्कूलसमोर आली. त्या वेळी बसचालक महेश ऐरूणकर आणि वाहक बबन मुसगुसे यांना मागील इंजिनमधून धूर येत असल्याचे लक्षात येताच बस रस्त्याच्या कडेला थांबवली आणि तातडीने सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे खाली उतरवले.

# समाजात वाहतूक नियमांची जनजागृती होणे खूपच गरजेचे प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा पथक तयार करणे, वाहतूक नियमांबाबत जनजागृती करणे, विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमाबद्दल माहिती देऊन अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी शाळा महाविद्यालय स्तरावरून समाजामध्ये वाहतूक सुरक्षा व वाहतूक नियमांचा प्रचार व प्रसार आणि प्रबोधन होणे गरजेचे आहे. यासाठी ठाणे पोलिस आयुक्तालयातील शाळांमध्ये ५ वी ते ७ वी चा वर्गातून वाहतूक नियमांवर आधारित चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे. असे ठाणे शहर वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाठ यांनी आर.एस. पी. सहविचार सभेमध्ये मार्गदर्शन करताना सांगितले.

रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या पूर्व नियोजनासाठी पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांचे अध्यक्षतेखाली वाहतूक पोलीस निरिक्षक युवराज सरनोबत, रस्ता सुरक्षा अभियान विभागीय समन्वय अधिकारी डॉ.मनिलाल शिंपी यांचा मार्गदर्शाखाली विभागीय मार्गदर्शक माणिक पाटील, ठाणे जिल्हा समन्वय अधिकारी जितेंद्र सोनवणे, उपजिल्हा समादेशक विनोद शेलकर, कल्याण डोंबिवली जिल्हा समन्वय अधिकारी अनंत किनगे यांचा प्रमुख उपस्थितीत (आर एस पी) विषयाचा प्रचार व प्रसार करणे, RSP शिक्षक अधिकारी प्रशिक्षण बाबत नियोजन करण्यासाठी पोलीस उपायुक्त वाहतूक विभाग, तीन हात नाका, ठाणे येथील कार्यालयात सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी ठाणे पोलिसआयुक्तालयातील शाळांमध्ये ५ वी ते ७ वी च्या वर्गातून वाहतूक नियमांवर आधारित चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे. याची सर्व जबाबदारी कलाध्यापक संघाचे विभागीय अध्यक्ष दिगंबर बेंडाळे व विनोद शेलकर यांच्याकडे देण्यात आली आहे. तसेच ८ वी ते १० वी वर्गातील विद्यार्थ्यांना प्रकल्प ( प्रोजेक्ट ) स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे.

प्रत्येक विभागातून पाच स्पर्धकांना पारितोषिक, ट्रॉफी देऊन गौरव करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक विभागातून ३ संचलन पथक, व एक बँड पथक असे एकूण ३० पथकांमध्ये साकेत मैदान ठाणे येथे स्पर्धा घेण्यात येणार आहे. अशी माहिती वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी दिली.

रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत रस्ता सुरक्षा पथक तयार व्हावे, विद्यार्थ्यांचा माध्यमातून समाजापर्यंत वाहतुकीचे नियम प्रत्येक घरात गेले पाहिजेत, आर एस पी पथकाचे कार्य आणि महत्व वाढवण्यासाठी ठाणे शहर वाहतूक पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांच्या आदेशानुसार ठाणे जिल्हा माध्यमिक शिक्षणाधिकारी देविदास महाजन, जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.बाळासाहेब राक्षे यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक 5 डिसेंबर 2025 ते 7 डिसेंबर 2025 रोजी ठाणे शहर वाहतूक पोलिस उपायुक्त कार्यालय, तीन हात नाका, ठाणे येथे आर एस पी शिक्षक अधिकारी यांचे प्रशिक्षण, विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) मनिलाल शिंपी व दिलीप स्वामी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केले आहे.

या प्रशिक्षणासंबंधी ऑनलाइन अर्ज भरणे, नोंदणी करणे, आर.एस. पी.अधिकारी गणवेश इत्यादी बाबतची सविस्तर माहिती विभागीय समन्वय अधिकारी (नोडल ऑफिसर) मनिलाल शिंपी यांनी सविस्तर माहिती दिली. शाळेत आर एस पी हा विषय राबविण्यासाठी बालभारतीकडून रस्ता सुरक्षा विषयाचे पाठ्यपुस्तक इयत्ता नववी व दहावीसाठी तयार करण्यात आले आहे.एसएससी बोर्डाचा या विषयाचा P-5 हा सांकेतांक आहे. इयत्ता पहिली ते दहावी या वर्गासाठी हा विषय कसा राबवावा इत्यादी बाबत सविस्तर माहिती अनंत किनगे यांनी दिली.

यावेळी होली क्रॉस इंग्लिश हायस्कूलच्या प्राचार्या श्रीमती यशोदा नाईक यांना शिक्षण क्षेत्रातील राष्ट्रीय गरुडझेप पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांचा हस्ते पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

आर एस पी यूनिटचे मार्गदर्शक समाजसेवक माणिक पाटील, कलाध्यापक संघाचे कोकण विभाग अध्यक्ष दिगंबर बेंडाळे, विभागीय समन्वय अधिकारी मनिलाल शिंपी, कल्याण डोंबिवली जिल्हा समन्वय अधिकारी अनंत किनगे, ठाणे जिल्हा अतिरिक्त समन्वय अधिकारी जितेंद्र सोनवणे, ठाणे उपजिल्हा समन्वय अधिकारी विनोद शेलकर, आर एस पी अधिकारी बबन पाटील, सुभाष गायकवाड, ओमप्रकाश धनविजय, सतीश पाटील, होली क्रॉस इंग्लिश हायस्कूलच्या प्राचार्या श्रीमती यशोदा नाईक, संभाजी शेळके शाळा/ महाविद्यालयांचे प्राचार्य, मुख्याध्यापक उपस्थित होते.




# "श्री मावळी मंडळ श्री" शरीरसौष्ठव स्पर्धा संपन्न

**जिल्हास्तरीय "श्री मावळी मंडळ श्री" किताब हृषीकेश हरिदास शामगीर याने; तर अंतर्गत "श्री मावळी मंडळ श्री" किताब हर्ष दिगंबर धनावडे यांने पटकविला**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : प्रतिनिधी**

श्री मावळी मंडळ ठाणे संस्थेने शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित ३६वी जिल्हास्तरीय व अंतर्गत शरीरसौष्ठव "श्री मावळी मंडळ श्री" स्पर्धा शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी संस्थेच्या क्रीडांगणात मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेमध्ये अंतर्गत व जिल्हास्तरीय मिळून एकूण १७ व ७८ अशा ९५ स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे यांनी केले.

सदर स्पर्धेत अंतर्गत "श्री मावळी मंडळ श्री" किताब हर्ष दिगंबर धनावडे यांने पटकविला तर जिल्हास्तरीय "श्री मावळी मंडळ श्री" किताब ॲप्स स्टुडिओ जिम ठाणे या व्यायाम शाळेच्या हृषीकेश हरिदास शामगीरयाने पटकविला. विजेत्यांना प्रमुख पाहुणे नौपाडा पोलीस स्टेशन सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय यादव, विशेष अतिथी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पोलीस निरीक्षक सचिन सूर्यकांत मोरे, संस्थेचे अध्यक्ष सुधाकर मोरे, उपाध्यक्ष मनीष मुंदडा, खजिनदार रिक्सन फर्नांडिस, चिटणीस रमण गोरे, उप चिटणीस संतोष सुर्वे, सह चिटणीस चिंतामणी पाटील, विश्वस्त कृष्णा डोंगरे, विश्वस्त प्रभाकर सुर्वे, विश्वस्त पॅट्रिक फर्नांडीस व विश्वस्त केशव मुकणे यांनी सन्मानचिन्ह व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. या व्यतिरिक्त अनेक विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# राज्यातील शाळांमध्ये नव्याने पटपडताळणी १५ डिसेंबर पर्यंत माहिती अंतिम करण्याचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**राज्यातील काही शाळांमध्ये बोगस विद्यार्थी दाखवून पटसंख्या फुगविण्यात येत असल्याच्या तक्रारी होत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांमधील विद्यार्थी संख्येची काटेकोर पडताळणी केली जाणार आहे. १५ डिसेंबर पर्यंत माहिती अंतिम करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे बोगस विद्यार्थी संख्या दाखविणाऱ्या शाळा व संस्थांना चाप बसणार आहे.**

प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी उपस्थितीची माहिती यू-डायस प्लस या पोर्टलवर संबंधित मुख्याध्यापकाद्वारे नोंदविण्यात येते. या पोर्टलवर नमूद असलेल्या विद्यार्थी संख्येनुसार दरवर्षी संच मान्यता अंतिम केली जाते.त्या आधारावर त्या-त्या शाळांमधील शिक्षक पदांची संख्या निश्चित केली जात असते. परंतु काही शाळांमध्ये ही पटसंख्या वाढवून दाखवली जात असल्याने शिक्षकांची अनावश्यक पदे देखील निर्माण होत आहेत. पोर्टलवर दाखवलेली विद्यार्थी संख्या आणि प्रत्यक्ष वर्गात उपस्थित विद्यार्थी याची खातरजमा करण्याचा प्रयत्न शिक्षण खात्याचा या निमित्ताने आहे. या माहितीचे प्रमाणिकरण व सत्यता पडताळणीची जबाबदारी राज्यस्तरावर देखील विशेष पथकांची निर्मिती केली जाणार आहे. या पथकांच्या माध्यमातून एकाचवेळी सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती पोर्टलवरील नोंदीप्रमाणे आहे की नाही, हे तपासण्यात येणार आहे. पडताळणीत अनियमितता किंवा चुकीच्या पद्धतीने विद्यार्थी प्रविष्ट झाल्याचे निदर्शनास आल्यास त्या संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. कार्यक्षेत्रातील केंद्रप्रमुख व गट शिक्षणाधिकाऱ्यांवर टाकण्यात आली आहे. त्यामध्ये अनियमितता झाल्यास केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व मुख्याध्यापकांना जबाबदार धरण्यात येईल, असा इशारा शिक्षण खात्यातर्फे देण्यात आला आहे. मुख्याध्यापकांनी नोंदवलेली यू-डायस प्लस पोर्टलवरील विद्यार्थी संख्येची माहिती केंद्रप्रमुखांकडे वर्ग केली जाते. विद्यार्थ्यांची दैनिक उपस्थिती, भेटीच्या दिवशी हजर असलेले विद्यार्थी, परीक्षा दिवशी उपस्थित विद्यार्थी तसेच यापूर्वी शाळा भेट झाल्याच्या प्रसंगी असलेली दैनिक उपस्थिती या सर्व बाबी तपासून ही माहिती केंद्रप्रमुखांनी फेर पडताळणीसाठी गटशिक्षणाधिकारी लॉगिनला वर्ग करावयाची आहे. वर्ग झालेल्या विद्यार्थ्यांच्या या माहितीची गटशिक्षणाधिकाऱ्यांनी पुनश्च पडताळणी करावी, असेही बजावण्यात आले आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024